भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

वाहन विभाग

दिनांक :-१७/१०/२०२४

प्रति,
संगणक विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

विषय :- महानगरपालिकेचे वाहन क्र. एमएच-०४-एलक्यु-४६३३ (टाटा एलपीटी १२१६) (मॉडेल सन २०२३) या टँकर ची दुरुस्ती करणे बाबतची कोटेशन नोटीस मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये महानगरपालिकेचे वाहन क्र. एमएच-०४-एलक्यु-४६३३ (टाटा एलपीटी १२१६) (मॉडेल सन २०२३) या टँकर ची दुरुस्ती करणे बाबतची कोटेशन नोटीस मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी ही विनंती.

उप अभियंता (यांत्रिकी)
तथा वाहन विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दिनांक :-१७/१०/२५

कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि. २७ / १० /२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

महानगरपालिकेचे वाहन क्र. एमएच-०४-एलक्यु-४६३३ (टाटा एलपीटी १२१६) (मॉडेल सन २०२३) या टँकर वाहनाची दुरुस्ती :-

पाटे (स्प्रिंग) ची दुरुस्ती :- १) मागील बाजुचे डावी कडील टायर नट लुज करणे. २) जॅकच्या साह्याने वाहन उचलुन टायर बाहेर काढणे. ३) दोन्ही युक्लॅपचे नट खोलुन दोन्ही युक्लॅप बाहेर काढणे. ४) स्प्रिंग शकलचे पिनचे दोन्ही लॉक खोलुन पिन बाहेर काढणे. ५) स्प्रिंग सेट ला बाहेर काढुन सेंटर बोल्ट तोडुन सर्व पाटे वेगळे करणे. ६) तुटलेले पाटे बाहेर काढुन त्याजागी नविन स्टँडर्ड कंपनीचे ३, ४, ६, ८ नंबर पाटे घेऊन नविन सेंटर बोल्ट लाऊन स्प्रिंग सेट तयार करणे. ७) दोन्ही शॅकलचे जुने बुश तसेच हँगिंग शॅकलचे बुश हॅमरिंग करुन बाहेर काढणे. ८) नविन स्टँडर्ड कंपनीचे बुश, पिन, लॉक नविन फिटींग करुन ग्रिसिंग करणे. ९) स्प्रिंग सेटचे दोन्ही नविन २ नग युक्लॅप स्टँडर्ड कंपनीचे फिटींग करणे. **अल्टरनेटरची ची दुरुस्ती :-** १) स्टार्टर व अल्टरनेटर दोन्ही खोलुन सर्व प्रथम स्टार्टर पुर्णपणे डिसमेंटल करणे. २) डिसमेंटल केलेले स्टार्टर चे सर्व पार्ट पेट्रोल ने स्वच्छ करुन सव्हिसिंग करणे. ३) स्टार्टर चे खराब झालेले पार्ट, बुश, कार्बन होल्डर, कार्बन सोलोनाईट स्वीच नविन फिट करुन स्टार्टर ची फिटींग करणे. ४) डिसमेंटल केलेले अल्टरनेटर चे सर्व पार्ट पेट्रोल ने स्वच्छ धुवून सव्हिसिंग करणे. ५) अल्टरनेटर च्या दुरुस्ती कामी डायवट प्लेट, कट आऊट, कार्बन ब्रश, बेरींग नविन फिटींग करुन अल्टरनेटरची दुरुस्ती करणे. ६) नविन व्ही बेल्ट १ नग फिटींग करणे. ७) खराब झालेले डायवट प्लेट नविन फिट करुन अल्टनेटर ची पुर्ण दुरुस्ती करणे. **पाण्याच्या टाकीचे दुरुस्ती : -** सदर वाहनाची पाण्याच्या टँकरची वेल्डींग क्रॅक झाल्यामुळे पिण्याचे पाणी जास्त प्रमाणात लिकेज असुन दुरुस्ती कामी ज्या ठिकाणी लिकेज आहे तेथे ग्राडींग मशिनने घासुन कटर व्हीलने कट करुन दोन्ही बाजुला ३ mm चा पत्रा वेल्डींग करुन कारपेच भरुन दुरुस्ती करणे. **जॉईन्ट कपलिंगची दुरुस्ती :-** डिप्रेनशियल कडील फ्लेंज व मेन जॉईन्ट कडील फ्लेंजची कपलिंग व सर्व जॉईंटचे नट बोल्ट ८ mm x ४० mm = १६ नग खराब झाले आहे. तरी नमुद केलेले सर्व पार्ट नविन फिटींग करुन दुरुस्ती करणे.

उप अभियंता (यांत्रिकी)
तथा वाहन विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दिनांक१७/१०/२०२५
खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.
१) मनपा संकेतस्थळ